(महाराष्ट्र पोलीस राजपत्र, विभागीय भाग-६अ करिता)

क्र.पोमसं/३-अ/पदो- सशस्त्र पोनि/८८/२०१६.
**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय,**
**शहीद भगतसिंह मार्ग, कुलाबा,**
**मुंबई- ४०० ००१.**
दिनांक :- ७/०१/२०१७.

**वाचा:-** १. महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१, व

२. शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, क्र. एस्आर्व्ही-२०१५/ प्र.क्र.१५६/कार्या.१२, दिनांक २८/०४/२०१५, आणि अधिसूचना सुधारणा दि. १६/०७/२०१५.

## आदेश

उपरोक्त संदर्भ क्र.१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे,महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ मधील कलम-२२ ( न ) चे पोट कलम (२), त्याखालील सुधारीत स्पष्टीकरणानुसार, व उपरोक्त संदर्भ क्र.२ मध्ये नमूद केलेल्या अधिसूचनांचे पालन करुन, पोलीस आस्थापना मंडळ क्रमांक २ यांना प्रदान असलेल्या अधिकारांचा वापर करुन, खालील नमूद केलेल्या सशस्त्र पोलीस उपनिरीक्षकांना त्यांच्या नावांसमोर दर्शविलेल्या रकाना क्र. ४ मध्ये महसूली विभागाचे वाटप करण्यात आले असून, रकाना क्र. ५ मध्ये दर्शविलेल्या घटकांत त्यांची सशस्त्र पोलीस निरीक्षक पदावर **तात्पुरत्या स्वरूपात** कार्यभार ग्रहण केलेल्या दिनांकापासून खालील अटींच्या अधिन राहून पदोन्नतीवर पदस्थापना करण्यात येत आहे :-

| अ.क्र | सशस्त्र पोलीस उपनिरीक्षकाचे नांव | सध्याची नेमणूक | संदर्भ क्र. २ च्या तरतुदीनुसार वाटप करण्यात आलेला महसुली संवर्ग | सशस्त्र पोलीस निरीक्षक पदावर तात्पुरत्या स्वरुपात दिलेल्या पदोन्नतीवरील नेमणूक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४. | ५. | ६. |
| १ | नजिमखान शेरखान पठाण | गट ३, जालना | औरंगाबाद - १ | रा.रा.पो.बल गट क्र. १४, औरंगाबाद | रिक्त पदात |
| २ | बाळुराम हिरालाल पाटोरकर | गट ९, अमरावती | नागपूर - १ | रा.रा.पो.बल गट क्र. १५ गोंदिया | रिक्त पदात |
| ३ | महाविर मारुती बनसोडे | गट ८, मुंबई | नागपूर - २ | रा.रा.पो.बल गट क्र.१३ नागपूर | रिक्त पदात |
| ४ | कैलास उत्तम पवार | गट ६, धुळे | नाशिक - १ | रा.रा.पो.बल गट क्र. ६ धुळे | रिक्त पदात |
| ५ | सूर्यकांत अण्णा शारबिंद्रे | गट ११, नवी मुंबई | औरंगाबाद - ३ | रा.रा.पो.बल गट क्र.१२ हिंगोली | रिक्त पदात |
| ६ | बापूराव राजाराम गोरे | गट १०, सोलापूर | पुणे - १ | रा.रा.पो.बल गट क्र. १ पुणे | रिक्त पदात |
| ७ | हिमायत अहमदपाशा कादरी | प्रशिक्षण केंद्र, नानविज | पुणे - २ | पोलीस प्रशिक्षण केंद्र, नानविज | रिक्त पदात |
| ८ | विश्वास दत्तू महेकर | गट ८, मुंबई | पुणे - ३ | महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे | रिक्त पदात |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ९ | भानुदास अकाराम पाटील | गट ११, नवी मुंबई | नाशिक - २ | रा.रा.पो.बल गट क्र. ६ धुळे | रिक्त पदात |
| १० | दत्तात्रय दासू बंडगर | गट १६, कोल्हापूर | नागपूर - ३ | रा.रा.पो.बल गट क्र. १५ गोंदिया | रिक्त पदात |
| ११ | विकास विष्णू पाटील | म.गु.प्रबोधिनी, पुणे | कोंकण - १ | रा.रा.पो.बल गट क्र. ११ नवी मुंबई | रिक्त पदात |
| १२ | सुभाष धोंडीबा अहिनवे | प्रशिक्षण केंद्र, नानविज | कोंकण - २ | रा.रा.पो.बल गट क्र. ११ नवी मुंबई | रिक्त पदात |
| १३ | संतोष गणपतराव गायके | म.गु.प्रबोधिनी, पुणे | कोंकण - ३ | रा.रा.पो.बल गट क्र. ८ मुंबई | रिक्त पदात |
| १४ | गोवर्धन यादवराव पवळ | गट ५, दौंड | औरंगाबाद - २ | रा.रा.पो.बल गट क्र. ३ जालना | रिक्त पदात |

२. उपरोक्त सशस्त्र पोलीस उपनिरीक्षकांना पदोन्नतीच्या घटकात हजर होण्यासाठी तात्काळ कार्यमुक्त करण्यात यावे, व त्यांना कार्यमुक्त केल्याचा दिनांक त्याच दिवशी ह्या कार्यालयास कळवावा. तसेच, ते पदोन्नतीच्या ठिकाणी हजर होताच, त्यांनी सशस्त्र पोलीस निरीक्षकपदी कार्यभार स्विकारल्याचा दिनांक सुध्दा संबंधीत घटक प्रमुखांनी विनाविलंब ह्या कार्यालयास कळवावा.

३. सदर सशस्त्र पोलीस उपनिरीक्षकांना देण्यात आलेली सशस्त्र पोलीस निरीक्षक पदावरील **तात्पुरती पदोन्नती** ही खालील अटींच्या अधिन राहून देण्यात येत आहे:-

**अ)** सदर पदोन्नती प्रथम ११ महिने, किंवा शासन, व महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांचेकडून निवडसूचीस मान्यता मिळेपर्यंत, यापैकी जे अगोदर घडेल त्या कालावधीकरिता असेल, व

**आ)** सदर तात्पुरत्या पदोन्नतीमुळे संबंधीत सशस्त्र पोलीस उपनिरीक्षकांना नियमीत पदोन्नतीचे, व सेवाज्येष्ठतेचे कोणतेही अधिकार प्राप्त होणार नाहीत.

४. **वर नमूद केलेल्या तात्पुरत्या पदोन्नतीच्या आदेशाधिन असलेल्या सशस्त्र पोलीस उपनिरीक्षकांपैकी एखद्याविरुध्द आता गुन्हा दाखल झाला असेल / निलंबनाची कारवाई केली असेल / न्यायालयीन प्रकरण प्रलंबित असेल, किंवा ते एखादी शिक्षा भोगत असतील तर, संबंधीत घटक प्रमुखांनी त्यांना पदोन्नतीवर न सोडता त्यांच्याविरूध्दच्या प्रकरणाची सविस्तर माहिती या कार्यालयास फॅक्सव्दारे तात्काळ पाठवावी, व पुढील आदेशांची वाट पहावी.**

५. उपरोक्त आदेशांत नमूद केलेल्या ज्या सशस्त्र पोलीस उपनिरीक्षकांविरूध्द विभागीय चौकशी प्रलंबित आहे, अथवा विभागीय चौकशीत निर्गमीत केलेल्या सौम्य शिक्षेची अंमलबजावणी अद्याप सुरू झालेली नाही, अशा सशस्त्र पोलीस उपनिरीक्षकांकडून त्यांना भविष्यात होणारी शिक्षा ते पदोन्नतीच्या पदात भोगण्यास तयार असल्याबाबतचे त्यांच्याकडून दिनांकित स्वाक्षरी केलेले **लेखी हमीपत्र घेवून व त्यास अधिन राहूनच** त्यांना पदोन्नतीवर सोडण्यात यावे. तसेच, संबंधीत सशस्त्र पोलीस उपनिरीक्षकांना पदोन्नतीवर कार्यमुक्त केलेल्या आदेशांतही तसा स्पष्ट उल्लेख करण्यात यावा. सदर आदेशांची व त्यांच्या लेखी हमीपत्राची प्रत ह्या कार्यालयातील कार्यासन अधिकारी, १) का.क्र.३-अ २) का.क्र. ११ व ३) का.क्र.११-अ यांना स्वतंत्रपणे लक्षवेध करून, न चुकता सादर करावी. तसेच, त्याची प्रत संबंधीत सशस्त्र पोलीस उपनिरीक्षक ज्या घटकात आता पदोन्नतीवर हजर होणार आहेत, त्या घटकप्रमुखांना देखील न चुकता पाठवावी. तसा अनुपालन अहवाल या कार्यालयास कार्यासन क्र.३-अ यांना लक्षवेध करून सादर करावा.

६.	**उपरोक्त आदेशांमधील सशस्त्र पोलीस उपनिरीक्षक जर मागास प्रवर्गातील असतील तर, त्यांच्या जात वैधता प्रमाणपत्राची पडताळणी झालेली असल्याची खातरजमा करावी. उपरोक्त आदेशांतील ज्या मागासवर्गीय पोलीस अधिकाऱ्यांकडे जात वैधता प्रमाणपत्र नसेल, त्यांचेकडून ते प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही संबंधीत घटकप्रमुखांनी करावी; तोपर्यंत त्यांना पदोन्नतीवर कार्यमुक्त करु नये.**

७.	येथून पुढे सशस्त्र पोलीस उपनिरीक्षक ते सशस्त्र पोलीस निरीक्षक पदावर देण्यात येणाऱ्या सर्व पदोन्नती मा.उच्च न्यायालयाच्या मुंबई खंडपिठापुढील दाखल याचिका क्र. २७९७/२०१५ व याचिका क्र. ४७०/२००५ मधील अंतिम निर्णयाच्या अधिनस्त राहून देण्यात येत आहे.

८.	सशस्त्र पोलीस उपनिरीक्षकांना सशस्त्र पोलीस निरीक्षक पदावर पदोन्नतीवरील पदस्थापना, शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, क्र. एस्आर्व्ही-२०१५/प्र.क्र.१५६/कार्या.१२, दिनांक २८/०४/२०१५ व अधिसूचना सुधारणा दि. १६/०७/२०१५ मधील तरतुदीनुसार देण्यात आलेली आहे

९.	शासन पत्र, गृहविभाग, क्र.पीएम्एन्-०१०८/प्र.क्र.८८३/पोल ५ ब, दि.२९/७/२००८ मध्ये नमूद केल्यानुसार, शासन निर्णय, गृहविभाग, क्र.पीएम्एन्-०२९७/सीआर्-४७४/पोल-५ ब, दि.२६/२/२००४ अन्वये महाराष्ट्र पोलीस दलातील त्यावेळी राजपत्रीत "गट ब" असलेल्या पोलीस निरीक्षक पदाचा दर्जा वाढवून ते पद "गट अ" चे करण्यात आले आहे. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद-३२० नुसार राज्य शासनाच्या सेवेतील सर्व राजपत्रीत पदें लोकसेवा आयोगाच्या कक्षेत येतात. याबाबत, आयोगास पाठविण्यात येणाऱ्या प्रस्तावास मिळणाऱ्या मंजुरीच्या अधिन राहून सदर पदोन्नतीचे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

१०.	**तसेच, शासन पत्र, गृहविभाग, क्र.पीएम्एन्-०१०८/प्र.क्र.१३४/पोल-५ ब, दि.२२/१०/२००८ अन्वये पोलीस निरीक्षकांपर्यंतच्या राजपत्रीत पदावरील पदोन्नती नियमित करण्याबाबतच्या आदेशांना शासन मान्यतेच्या अधिन राहून पदोन्नतीचे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.**

११.	सदर पदोन्नती आदेशांमधील सशस्त्र पोलीस उपनिरीक्षक हे जर ओदशांमध्ये नमूद केलेल्या घटकांमध्ये सध्या कार्यरत नसतील तर, ते **ज्या घटकात कार्यरत आहेत, त्या घटकप्रमुखांनी** त्यांना पदोन्नतीच्या घटकात हजर होण्यासाठी तात्काळ कार्यमुक्त करावे, व तसे ह्या कार्यालयास न चुकता कळवावे.

१२.	सदर आदेश http://www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर FLASH या शिर्षाखाली देखील उपलब्ध होतील.

**सतीश माथुर**
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत,

संचालक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे
समादेशक, रा.रा.पो.बल गट क्र. १ पुणे / ३ जालना / ५ दौंड / ६ धुळे / ८ मुंबई / ९ अमरावती / १० सोलापूर / ११ नवी मुंबई / १२ हिंगोली / १३ नागपूर / १४ औरंगाबाद / १५ गोंदिया / १६ कोल्हापूर
पोलीस अधीक्षक, यवतमाळ / गोंदिया / उस्मानाबाद
प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र, नानविज-दौंड

प्रत,

अपर पोलीस महासंचालक,रा.रा.पो.बल, म.रा., मुंबई
अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथकें, म.रा.,मुंबई

प्रत सविनय सादर,

अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, गृहविभाग,
दुसरा मजला, मंत्रालय हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-३२.

प्रत सस्नेह,

महालेखाकार-१ महाराष्ट्र राज्य, मुंबई
महालेखाकार-२, महाराष्ट्र राज्य, नागपूर
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे / सोलापूर / यवतमाळ / अकोला / गोंदिया / लातूर / सांगली / उस्मानाबाद / जालना / अमरावती / धुळे / कोल्हापूर

प्रत:-

पोलीस उपअधीक्षक, संगणक कक्ष, राज्य पोलीस मुख्यालय, मुंबई (सदर आदेश संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी)

कार्यासन अधिकारी, कार्यासन क्र.२/ ५-अ / ४०

**(राजकुमार व्हटकर)**
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना),
पोलीस महासंचालक यांचेकरिता